# अंतरलहरी

कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया, मुंबई

मे - ऑगस्ट २०१०  वर्ष ३ अंक २  पृष्ठे ८  रु. २/-




## निसर्गाशी योग्य नाते म्हणजे काय?

*प्रश्नकर्ता :* निसर्गाशी योग्य नाते म्हणजे काय?

*कृष्णमूर्ती :* पण मुळात तुम्ही निसर्गाबरोबरचे नाते अनुभवलंय का हेच माहित नाही. नाते 'योग्य' वगैरे काही नसते, फक्त नाते समजणे असते. योग्य विचाराप्रमाणे योग्य नातेसंबंध म्हणजे सूत्रांचा आधार स्वीकारणे असते. योग्य 'विचार' व योग्य 'विचार करणे' ह्या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. योग्य विचार म्हणजे जे योग्य असेल, जे सर्वमान्य असेल ते स्वीकारणे, त्याच्याशी जुळवून घेणे; तर योग्य विचार करणे ही गती आहे; ती समजण्यातून आलेली असते आणि समजणे हे सतत बदलत असते. तसेच योग्य नातेसंबंध आणि आपले निसर्गाशी असलेले नातेसंबंध समजणे यामध्ये फरक आहे. तुमचा निसर्गाशी काय संबंध आहे? निसर्ग म्हणजे नदी, झाड, जलद गतीने उडणारा पक्षी, पाण्यातील मासा, जमिनीतील खनिजे, धबधबे आणि उथळ तलाव? आपल्यापैकी बऱ्याच जणांना ह्या संबंधाचा गंध देखील नाही. आपण कधी झाडाकडे पाहतच नाही आणि जर पाहिले तर त्याच्या उपयुक्ततेच्या विचारातून पहातो; त्याच्या सावलीत तरी बसायचे असते किंवा लाकूड म्हणून ते तोडायचे असते. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाल्यास आपण झाडाकडे वापराच्या हेतूने पाहतो. आपण स्वत:ला पुढे केल्याशिवाय, स्वत:च्या सोईसाठी तिचा वापर करण्याच्या विचाराशिवाय



झाडाकडे पाहतच नाही. आपण ही पृथ्वी आणि तिच्यातून उत्पन्न होणाऱ्या वस्तूंकडे तसेच पाहतो. ह्या धरणीचे प्रेम नाही, फक्त उपयोग आहे. ह्या पृथ्वीचे खरे प्रेम असेल तर तिच्यातून उत्पन्न होणाऱ्या वस्तूंच्या वापरात मितव्यय असेल. म्हणजे जर आपल्याला आपले पृथ्वीशी असलेले संबंध समजायचे असतील तर पृथ्वीतील वस्तूंचा वापर करताना तो अत्यंत काळजीपूर्वक व्हायला हवा. आपला निसर्गाशी असलेला संबंध समजणे हे आपल्या शेजाऱ्यांशी, बायकामुलांशी असलेले संबंध समजण्याइतकेच कठीण आहेत. परंतु आपण ह्याचा विचारच करत नाही. आपण निवांतपणे बसून चंद्र, तारे, झाडे पाहिलेच नाहीत. आपण सामाजिक, राजकीय गोष्टीत खूपच गुंतलेले असतो. ह्या गोष्टी करणे म्हणजे स्वत:पासून पळवाटाच आहेत हे उघड आहे आणि निसर्गाची पूजा करणे ही देखील स्वत:पासून पळवाटच आहे. आपण निसर्गाला पळवाट म्हणून किंवा उपभोगाचे साधन म्हणून वापरतो – आपण कधी क्षणभर थांबत नाही आणि पृथ्वी व तिच्या गोष्टींवर प्रेम करीत नाही. जरी आपण त्या समृद्ध शेतांचा वापर पोट भरण्यासाठी व शरीर झाकण्यासाठी करतो, तरी त्या शेतांचा आनंद आपण कधीच घेत नाही. आपल्या हाताने त्या शेतांची मशागत करायला आपल्याला कधीच आवडत नाही. कष्टाचे काम करायला आपल्याला लाज वाटते. तुम्ही जेव्हा मातीत हात घालून काम करता तेव्हा एक विलक्षण गोष्ट घडत असते. परंतु हे काम फक्त खालच्या जमातीकडून करवले जाते; शरीरकष्टाची कामे करायला आपण उच्चजातीय खूपच मोठे, महत्त्वाचे आहोत, म्हणून आपला निसर्गाशी संबंध सुटला आहे.

एकदा का आपल्याला आपला निसर्गाशी असलेला संबंध समजला, त्या संबंधाचा खरा संदर्भ समजला की आपण जमीन तुझी व माझी म्हणून विभागणार नाही; आपली थोडीशी जमीन  जरी असेल आणि रहायला त्यावर घर बांधलेले असेल तरी ती खास अर्थाने 'माझी' किंवा 'तुमची' नसेल; ती फक्त एक आसऱ्याचे साधन असेल. आपण पृथ्वीवर व तिच्यातून निर्माण होणाऱ्या गोष्टींवर प्रेम करीत नसल्यामुळे आणि त्यांचा फक्त वापर करीत असल्यामुळे एखाद्या धबधब्याच्या सौंदर्याला भावशून्य रहातो, आपण जीवनाच्या स्पर्शाला मुकतो, आपण झाडाच्या बुंध्याला पाठ टेकून कधी बसत नाही. आपण निसर्गावर प्रेम करीत नाही म्हणून आपल्याला माणूस, प्राणीमात्र ह्यांच्यावर कसे प्रेम करतात ते माहित नाही. त्या पलीकडे रस्त्याच्या टोकाला जा आणि पहा बैलांना कसे वागवले जाते, त्यांच्या पूर्णपणे बेढब झालेल्या शेपट्या पहा. तुम्ही माना हलवाल आणि म्हणाल, 'अरेरे'. परंतु आपण नाजूकपणाची भावना हरवली आहे, सौंदर्यपूर्ण गोष्टींद्दल संवेदनशीलता, त्यांना प्रतिसाद शिल्लक राहिलेला नाही. त्या संवेदनशीलतेचे पुनरुज्जीवन झाले तरच आपण खरे परस्परसंबंध समजू शकू. फक्त एखादे चित्र भिंतीवर लटकवण्याने किंवा एखाद्या झाडाचे चित्र रंगविण्याने, किंवा चार फुले डोक्यात खोचण्याने ती संवेदनशीलता येत नसते. जेव्हा ही उपयुक्तेची दृष्टी बाजूला सारली जाईल तेव्हाच ती संवेदनशीलता येईल. ह्याचा अर्थ असा नव्हे की आपण पृथ्वी वापरायची नाही; परंतु ज्या उपयोगासाठी ती आहे तेवढीच ती वापरली जावी. पृथ्वी प्रेम करण्यासाठी आहे. तिची काळजी वाहण्यासाठी आहे. तुमची व माझी अशी तिची विभागणी करण्यासाठी नव्हे. अंगणात एक झाड लावून ते 'माझे' म्हणणे हा मूर्खपणा आहे. जेव्हा विभागण्यापासून संपूर्ण मुक्त होता येईल तेव्हाच संवेदनशीलतेची शक्यता आहे–फक्त निसर्गाबद्दलच संवेदनशीलता नव्हे तर माणसांबद्दल आणि जीवनातील न संपणाऱ्या आव्हानांबद्दल देखील.

पुणे, १७ ऑक्टोबर १९४८

संपादकीय

निसर्गाविषयी एके ठिकाणी कृष्णमूर्ती म्हणतात, 'माणूस जेव्हा ढवळाढवळ करीत नाही तेव्हा तेथे फक्त संतुलनाचे, सुसंगतीचे सौंदर्य असते'. माणूस सोडला तर विश्वात फक्त निखळ संतुलन कार्यरत आहे.

गंभीरपणे विचार केला तर ह्या विधानात खूप काही सामावलेले आहे. मुख्यत: खूप चर्चिल्या जाणाऱ्या आजच्या वातावरणाच्या संबंधात त्याला एक वेगळे स्थान आहे. वातावरण व मानव ह्या संबंधाला अनेक पैलू आहेत. इथे सर्वांचा विचार होणे संभवत नाही. मानवाचे निसर्गाशी नाते हा विषय मानवी इतिहासात कधी नव्हे इतका महत्त्वाचा झाला आहे. Deep Ecology म्हणून एक विचारधारा आहे,जी मानवाचे व निसर्गाचे परस्परसंबंध खोलवर जाऊन पाहू इच्छिते. कृष्णमूर्तीदेखील वरवर दिसणाऱ्या परिणामाबद्दल बोलत नाहीत; ह्याचे मूळ खोलवर कुठेतरी माणसाच्या जाणीवेत, माणसाच्या स्वत:ला समजण्यातील त्रुटीमध्ये रुजले आहे, जे अनेक प्रकारच्या संहारांना कारणीभूत आहे. वातावरणाची नासधूस हे त्यापैकी एक प्रकटीकरण आहे.

निसर्गाचा वापर करताना मानवाने निसर्गाला ज्या कडेलोटापर्यंत आणून सोडले आहे त्या कडेलोटापर्यंत नकळत स्वत:ला पण आणून सोडले आहे – हे कळणे कठीण आहे आणि कळलेच तर चर्चा, खलबते, एकमेकांना दोषी ठरवणे ह्या पातळीवर ते थांबते. म्हणून घसरण चालूच आहे.

आता प्रश्न असा आहे – निसर्ग म्हणजे काय? निसर्ग हा शब्द उच्चारला की डोळ्यासमोर आकाश, पाणी, डोंगर, नद्या, झाडे, पाने, फुले, प्राणी हे येतात. मी माणूस आणि हा समोर निसर्ग – असे विभाजन मनात असते. 'मी' त्याचा वापर करणारा, त्याचा उपभोग घेणारा, त्याचा सांभाळ करणारा वगैरे.

आपण विसरतो की हा 'मी' देखील निसर्ग आहे. कार्ल सागन जेव्हा म्हणतो की हे समोरचे झाड माझे भाऊबंद आहे, तेव्हा त्याला काय म्हणायचे आहे? विज्ञान जेव्हा पृथ्वीवरील सर्व वस्तुंमधील मूलतत्त्वे तीच आहेत असे दाखवते तेव्हा त्यातून आपण काय शिकायचे? विश्वामध्ये ही मूलतत्त्वे अनेक रूपे, अनेक आकार घेतात, परत त्या मूलतत्त्वात विलीन होतात आणि नवीन सुधारित प्रकार येतात, हे कालचक्र आहे. त्या कालचक्रात काही लक्ष्यवेधी घटना घडतात परंतु या अनंत विश्वामध्ये त्या नगण्यच असतात.

मग माणूस – जो काही दशके त्या पृथ्वीतलावर मानवी रूपात तिचा रहिवाशी असतो – तो आपल्याला निसर्गापासून वेगळा समजून त्याचे एवढे अवडंबर का करतो? निसर्गापासून तो स्वत:ला वेगळा केव्हा आणि का समजायला लागला? शरीर, जे तो स्वत:चे समजतो, त्यावर तरी त्याचा ताबा आहे का? त्याच्या हृदयाचे ठोके, त्याचे रक्ताभिसरण, अन्नपचन असे अनेक व्यवहार नैसर्गिक नाहीत का? स्वत:च्या अस्तित्वाची जाणीव असण्याचा छोटासा भाग सोडला तर आपण झाडाफुलांप्रमाणे संपूर्ण निसर्गाधीन आहोत. निसर्गापासून स्वत:ला वेगळे समजणे हा भ्रम आहे आणि या भ्रमाचे निसर्गावर व पर्यायाने मानवावर विपरीत परिणाम होत आहेत.

आपल्या सुसाट धावणाऱ्या जीवन पद्धतीत थोडा संथपणा आणून ह्या प्रश्नांचे आकलन केले तर आपली जीवनधारा पार बदलू शकेल. बऱ्याच भ्रमांचे निरसन होईल. निसर्ग हे उपभोगाचे साधन राहणार नाही, तर तो सहजीवनाचा भाग होईल. मग निसर्गाशी मानवाचे नाते काय, हा प्रश्न कदाचित चुकीचा असेल किंवा असंबद्ध असेल. जेथे द्वंद्व नाही तेथे नाते शब्दाचा अर्थ संपला. नाते दोन गोष्टीत असते. आपल्याला स्वभान (self-consciousness) आणि विचारस्वातंत्र्य लाभले आहे. (ज्याच्याबद्दल देखील मनोवैज्ञानिक साशंक आहेत.) त्यातून निवड, नियंत्रण, निर्णय घेण्याची क्षमता मिळाली आहे. कदाचित हीच क्षमता आपल्याला त्या निरागस आनंदापासून वंचित करीत असावी.

तो निरागस आनंद पक्षांच्या कुजनात, वाऱ्याच्या संथ झुळुकेत, कोवळ्या सूर्यकिरणांच्या उबेत आहे. इथे 'तो' तिथे निसर्ग आणि 'मी' त्याचा आनंद घेत आहे ही भावना नसेल, त्यात द्वंद्वाचा भास नसेल, उपभोगाची आस नसेल. म्हणायचेच असेल तर हेच मानवाचे निसर्गाशी नाते आहे.

---

येथील बागेत उंच उंच झुपक्यांनी वाढणारे गवताचे तण सगळीकडे वाढलेले दिसतात. त्यांना पिसांसारखी गवतीफुले येतात. ही गडद सोनेरी रंगाची फुले वाऱ्याच्या झुळकांनी सारखी नाचत डोलत राहतात. कधीकधी जोराच्या वाऱ्यामुळे इतकी झुकतात की मोडून जातील की काय असे वाटते. पण ती सहसा मोडत मात्र नाहीत. अगदीच जोराचा वारा आला, तरच मोडून जातात. या गवती तणांच्या एका झुपक्यावरची पिंगट फुले वाऱ्याने जेव्हा नाचू डोलू लागतात, तेव्हा प्रत्येक फुलाच्या दांड्याच्या नृत्याची लय वेगवेगळी असते. आणि जेव्हा ती सर्व एकत्र नाचू डोलू लागतात, तेव्हा त्यांची एक लहरच बनून जाते. सांध्य प्रकाशात या फुलांचा रंग अगदी अवर्णनीय असतो. मग त्यांचा तो रंग म्हणजे त्या मावळत्या सूर्याचा, त्या धरणीचा, त्या सोनेरी टेकड्यांचा आणि त्या मेघांचाच रंग बनून जातो. या नाजूक सुंदर गवती फुलांच्या जवळ असणारी फुले मात्र अगदीच सामान्य, जरड दिसत होती. आपल्याकडे लोकांनी पहावे असा जणू त्यांचा आग्रह होता. त्या गवती तणांमध्ये एक प्रकारचा नाजुकपणा होता. त्यांना गव्हाच्या रोपांसारखा आणि अगदी पुरातनकालीन असा वास येत होता. त्यांच्यामध्ये एक प्रकारची पवित्रता होती, दृढता होती. चैतन्यमयता होती – आता एका काळसर टेकडीमागे सूर्य मावळत होता. त्या सांध्य प्रकाशाने उजळलेला एक मेघ हळूहळू सरकत होता. नुकत्याच पडून गेलेल्या पावसाने धरणीला एक मृदू सुगंध प्राप्त करून दिला होता. हवेत सुखकर गारवा नांदत होता. आता मधूनमधून पाऊस बरसत असल्यामुळे धरणीमध्ये आशा लहरू लागली होती.

*कृष्णमूर्तींची दैनंदिनी*, २५ ऑक्टोबर १९६१

## तेथे फक्त अवधान असते

आता, 'पाहणे – किंवा ऐकणे' ही जीवनातील एक कठीणातील कठीण गोष्ट आहे. दर्शन करणे आणि श्रवण करणे तसे एकच असते. तुमच्या चिंतांनी, काळज्यांनी जर तुमची दृष्टी अधू झालेली असली, तर तुम्ही सूर्यास्ताचे सौंदर्य पाहू शकत नाही. आपण बहुतेकजणांनी निसर्गाशी, सृष्टीशी असलेला आपला संपर्क गमावला आहे. मानवी संस्कृतीचा ओघ जास्तीत जास्त प्रमाणात मोठमोठ्या शहरांकडे वळत आहे. आपण अधिकाधिक शहरी बनत चाललो आहोत, गर्दीने भरलेल्या खोल्यांतून राहत आहोत. एखाद्या सकाळी किंवा सायंकाळी विशाल आकाशाकडे पाहू म्हटले तर आपल्याला जागाच नसते, आणि म्हणून केवढ्या तरी सौंदर्याला आपण पारखे झालो आहोत, आपल्यापैकी किती थोडे लोक सूर्योदय किंवा सूर्यास्त निवांतपणे पाहतो किंवा कौमुदीच्या धवलतेचा आणि पाण्यावरील चमचमत्या किरणांचा आनंद लुटतो ह्याची जाणीव तुम्हाला आहे की नाही न कळे.

निसर्गाचे सान्निध्य असे गमावून बसल्यामुळे आपण आपली बौद्धिक क्षमता वाढविण्याचा प्रयत्न करू लागतो. आपण भाराभर पुस्तके वाचतो, ठिकठिकाणी वस्तुसंग्रहालये पहातो, कार्यक्रमांना हजर राहतो, दूरचित्रवाणी पाहतो किंवा इतर अनेक प्रकारे करमणूक करून घेतो. दुसऱ्या लोकांच्या कल्पना आपण अखंडपणे उदधृत करीत असतो आणि कलेसंबंधी ऊहापोह व चर्चा तर मनसोक्त करीत असतो. आपण कलेवरती एवढे अवलंबून असतो ते का? त्यात एक प्रकारची पळवाट किंवा उत्तेजित होणे यांचा काही भाग येतो का? तुम्ही जर निसर्गाशी थेटपणे, निकटपणे संपर्कात असाल, पंख पसरून उड्डाण करणाऱ्या विहंगमाची गती अवलोकन कराल, आकाशाचे क्षणोक्षणी पालटणारे स्वरूप पहाल, टेकड्यांवरील ढगांच्या सावल्या पहाल किंवा दुसऱ्या एखाद्या व्यक्तीच्या मुद्रेवरील सौंदर्याचे दर्शन कराल तर मग तुम्हाला असे वाटते का, की एखाद्या चित्रासाठी वस्तुसंग्रहालयाकडे तुम्हाला वळावेसे वाटेल? ह्या भोवतालच्या प्रत्यही दिसणाऱ्या सर्व वस्तुमात्रांकडे, त्यातील ओतप्रोत सौंदर्याकडे कसे पहावे हे तुम्हांला माहीत नाही म्हणूनच कदाचित तुम्ही अंमली पदार्थ सेवन करूनही आपली दर्शनशक्ती वाढविण्याचा प्रयत्न करीत असता....

.... कोणत्याही आनुषंगिक विचारांशिवाय, संचित माहितीशिवाय, पूर्वग्रह, मूल्यमापने, न्यायनिवाड्याशिवाय, प्रत्यक्षात जसे आहे तसे पाहण्याच्या आड येण्याऱ्या कोणत्याही शब्दांच्या पडद्याविना, कधीतरी एक प्रयोग म्हणून तरी तुम्ही झाडासारख्या एखाद्या साध्या गोष्टीकडे केवळ निखळपणे पाहिले आहे का? पहा तरी एकदा, आणि तुमच्या सर्वस्वासकट, तुमच्यातली सगळी उर्जा एकवटून जर एखाद्या वृक्षाकडे पाहिलेत तर काय घडते तेही बघा. त्यात, पाहता पाहता जी कमालीची उत्कटता येते तीत द्रष्टा, पाहणारा असा मुळीच नसतो असे तुम्हाला कळून येईल. तेथे फक्त अवधान असते. आणि अनवधान जेव्हा असते तेव्हाच एकाग्रता ढळते. तेव्हाच, द्रष्टा व दृश्य असा भेद उत्पन्न होतो. जेव्हा एखाद्या वस्तूकडे पूर्ण अवधानाने तुम्ही पाहता तेव्हा संकल्पना, सूत्रे किंवा स्मृती यांना जागाच उरत नाही हे समजून घेणे फार महत्त्वाचे आहे, कारण येथून पुढे आपण अशा काही विषयात शिरत आहोत की तेथे अत्यंत सजगतेने, काळजीपूर्वक शोध घेण्याची गरज आहे.

ज्या मनाला वृक्षांकडे, तारकांकडे, किंवा एखाद्या नदीच्या चकाकणाऱ्या जलप्रवाहाकडे स्वच्छंदपणे, अगदी पूर्णपणे मुक्त होऊन पाहता येते त्यालाच सौंदर्य म्हणजे काय ते कळते. आणि जेव्हा आपण असे प्रत्यक्ष, साक्षात दर्शन करतो तेव्हा मात्र आपण प्रेमाच्या अवस्थेत असतो.

*ज्ञातापासून मुक्ती*



## ...जे या पृथ्वीची पर्वा करीत नाहीत

आपण संघर्षाविषयी बोलत आहोत. आणि या अनमोल खजिन्याने नटलेल्या पृथ्वीवर राहत आलेली सर्व मानव जात सतत संघर्षामध्ये राहिलेली आहे, केवळ बाहेरच्या पर्यावरणाबरोबर, निसर्गाबरोबर नव्हे तर आंतरिक देखील, तथाकथित अध्यात्मिकदृष्ट्या आपण सतत संघर्षामध्ये आहोत. ज्या क्षणी आपण जन्माला आलो त्या क्षणापासून ते आपल्या मृत्यूच्या क्षणापर्यंत आपण संघर्षामध्येच राहत असतो. आपण त्याच्याशी जुळवून घेतले आहे. आपण त्याची सवय लावून घेतली आहे. आपण ते सहन करीत आहोत. आपल्याला संघर्षाबरोबर का रहावे लागते. याची आपण अनेक कारणे शोधून काढतो. आपण विचार करतो की झगडणे आणि सतत प्रयत्न करणे म्हणजे प्रगती – बाहेरील भौतिक प्रगती किंवा अत्युच्च ध्येयाप्रत नेणारे आंतरिक साध्य-साधन.

हा सुंदर भारत देश आल्हाददायक टेकड्यांनी, आश्चर्यकारक विशाल डोंगरांनी, प्रचंड नद्यांनी विनटलेला आहे. परंतु हजारो वर्षांच्या दु:खाने, संघर्षाने, शरण जाण्याने, सहनशीलतेने, एकमेकांना नष्ट करीत आपण त्याला अशा अवस्थेपर्यंत आणले आहे – भरकटलेला, अविचारी रानटी मानवी समूह जे या पृथ्वीची पर्वा करीत नाहीत, या धरतीवरील सुंदर गोष्टींची पर्वा करीत नाहीत, जलाशयांच्या सौंदर्याची पर्वा नाही आणि संथ वाहणाऱ्या नद्यांची पर्वा नाही. आपल्यापैकी कोणालाच त्याची काळजी वाटत नाही. ज्याच्याविषयी आपल्याला तळमळ आहे. ती म्हणजे माझा स्वत:चा लहानसा 'स्व' किंवा 'अहं', आपल्या छोट्याशा समस्या याविषयी. या देशांत आपण जे काही करीत आहोत ते पाहून रडायला येते. तसेच दुसऱ्या देशात जे चालले आहे ते पाहून सुद्धा.

जीवन असामान्यरित्या धोकादायक बनलेले आहे, असुरक्षित, अर्थहीन. तुम्ही अनेक प्रकारे गर्भित अर्थ शोधून काढाल. परंतु प्रत्यक्ष दैनंदिन जीवनातील अर्थ आपण हरवून बसलो आहोत – फक्त पैसे मिळविणे सोडून, कोणीतरी होणे, सत्ताधारी होणे इ. इ....

.... तेव्हा शक्यतो तुम्ही राजकारण्यावर अवलंबून राहू शकत नाही. म्हणजेच शासनकर्त्यावर, किंवा धार्मिक ग्रंथावर किंवा कुठच्याही प्रकारच्या गुरूवर. कारण त्या लोकांनी हा जो देश आज आहे तो तसा केला आहे आणि जर आपण दुसरे नेते शोधायला गेलो तर ते सुद्धा चुकीच्या मार्गाने जातील आणि ज्याअर्थी कोणीही आपल्याला मदत करू शकत नाही तेव्हा आपल्याला संपूर्णपणे एकूण आपल्या वागणुकीला जबाबदार असले पाहिजे. आणि त्या दृष्टीने आपली वर्तणूक आणि आपली कृती झाली पाहिजे.

*मद्रास,* २७ डिसेंबर १९८१

# वृ|त्त|वि|शे|ष

## www.jkrishnamurti.org

*जे. कृष्णमूर्ती ऑनलाइन*

*कृष्णमूर्तींच्या अधिकृत शिकवणुकीचे इंटरनेटवरील भांडार*

**– काही प्रमुख वैशिष्ट्ये –**

* कृष्णमूर्तींचे १९३३ ते १९८६ पर्यंत प्रकाशित झालेले संग्रहित साहित्य – सुमारे २०० सर्वसाधारण आकाराची पुस्तके होतील एवढे – सर्व काही सर्च इंजिनमार्फत शोधण्याजोगे आणि आपल्या संगणकावर मोफत उतरवून घेता येण्याजोगे.
* कोणाही व्यक्तीला आपल्या आयुष्याविषयी पडणाऱ्या प्रश्नांचा कृष्णमूर्तींच्या शिकवणुकीच्या आधारे शोध – असे निवडक प्रश्न आणि विषय
* महत्त्वाचे शोधविषय – भीती, पूर्वसंस्कार, ध्यानधारणा, प्रेम, शिक्षण अशा महत्त्वाच्या विषयांचा निर्देश
* संपूर्ण लांबीची ७१ ध्वनीमुद्रणे
* संपूर्ण लांबीची अथवा संकलित ६६ ध्वनीचित्रमुद्रणे
* मुद्रित आवृत्ती, ध्वनीमुद्रणे, ध्वनीचित्रमुद्रणे अशा विविध माध्यमातील भाषणे, प्रश्नोत्तरे, चर्चा, मुलाखती आणि परिषदा अशा विविध अंगांचा आधुनिक पद्धतीने शोध घेण्याची सुविधा.
* दैनिक अवतरणे जी तुम्ही ईमेलद्वारे प्राप्त करू शकता.
* दैनिक अवतरणांचा संग्रह
* चरित्रात्मक माहिती
* डॉ. डेव्हिड बॉमकृत कृष्णमूर्तींची ओळख
* 'सत्य ही पथहीन भूमी आहे' या भाषणाची लिखित प्रत
* 'शिकवणुकीचा गाभा' – लिखित प्रत
* जगभरातील कृष्णमूर्ती फाउंडेशन्सच्या शाळा आणि अध्ययन केंद्रांबद्दलची माहिती
* ऑनलाइन पुस्तकविक्री स्थळ तसेच फाउंडेशनच्या भारत, इंग्लंड आणि अमेरिका येथील पुस्तक विक्रीच्या संकेतस्थळांचे दुवे

**डिव्हीडीज्च्या किंमतीत कपात**

कृष्णमूर्तींच्या ध्वनिचित्रफिती अधिकाधिक लोकांपर्यंत पोचण्याच्या उद्देशाने आता डिव्हीडीज्ची किंमत प्र. रु.२०० वरून रु.१२५ पर्यंत कमी करण्यात आली आहे. द्विस्तराच्या डिव्हीडीज्ची (ज्यात एकाहून अधिक भाषणे एकाच डिव्हीडीत उपलब्ध आहेत) किंमत प्र. रु.१५० असेल. MP3ची किंमत प्र. रु.१५० वरून रु.१०० करण्यात आली आहे.

**सवलतीच्या दरात इंग्रजी पुस्तके**

*Freedom From the Known* या कृष्णमूर्तींच्या अत्यंत महत्त्वाच्या आणि लोकप्रिय पुस्तकाची अतिशय सुरेख बांधणीतील आवृत्ती प्रकाशित करण्यात आली आहे. पूर्वीप्रमाणे रु. २० च्या सवलतीच्या दरातच ती उपलब्ध असणार आहे. वाचकांनी आपल्या मित्रमंडळ व आप्तेष्टांना एक बहुमोल आणि कायम स्वरूपाची अशी भेट देण्यासाठी ही आवृत्ती योग्य आहे.

*You Are the World* हे पुस्तकही पूर्वीच्या रु.१०० या किंमतीवरून रु.४० वर उपलब्ध करण्यात आले आहे. अमेरिकेतील विविध महाविद्यालयात कृष्णमूर्तींची झालेली भाषणे आणि संवाद यात आहेत.

**सवलतीच्या दरात डिव्हीडीज्**

पुस्तकांप्रमाणेच ध्वनिचित्रफितीदेखील सवलतीच्या दरात उपलब्ध करण्याच्या उपक्रमातील पहिली डिव्हीडी आहे *The Challenge of Change*. हा ८० मिनीटांचा माहितीपट म्हणजे कृष्णमूर्तींचे जीवन आणि त्यांची शिकवणूक यांची उत्कृष्ट ओळख आहे. ह्या डिव्हीडीची किंमत रू.८० करण्यात आली आहे. कृष्णमूर्तींच्या जाहीर भाषणांचा संच या उपक्रमातून लवकरच सवलतीच्या दरात उपलब्ध करण्याचा आमचा मानस आहे.

---

कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडियाच्या विद्यमाने होणारे **वार्षिक संमेलन** या वर्षी ऋषी व्हॅली, आंध्र प्रदेश येथे २३ – २६ नोव्हेंबर, २०१० या दरम्यान होणार आहे. आमच्या पुढील अंकात आणि वेबसाईटवर ह्याबद्दलची अधिक माहिती पुरविली जाईल.

## कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, सह्याद्री (KFI)

**विशेष अध्ययन कार्यशाळा**

| | | | |
|---|---|---|---|
| १५ ते २१ जून २०१० | The Core of the Teachings: An Introduction to J. Krishnamurti | १२ ते १८ जुलै २०१० | The art of listening, seeing and learning bring about the art of living |
| २ ते ६ ऑगस्ट २०१० | To be is to be related : Life in relationship | २० ते २४ सप्टेंबर २०१० | If you cannot relate with nature, you cannot relate with human beings |

**वार्षिक शिबिरे**

| | | | |
|---|---|---|---|
| १५ ते १९ मे २०१० | मराठी शिबीर | २१ ते २५ मे २०१० | हिंदी शिबीर |

**शिबिराचा उद्देश:** मराठी शिबिराचा हेतू आहे: आपले रोजचे जीवन तणावरहित पद्धतीने जगता येणे शक्य आहे का याचा जे. कृष्णमूर्तींच्या शिकवणीच्या अनुषंगाने शोध घेणे. हिंदी शिबिराचा हेतू आहे: ध्यान म्हणजे काय याचे जे. कृष्णमूर्तींच्या शिकवणीच्या अनुषंगाने आकलन करून घेणे.

**संपर्कासाठी पत्ता** : संचालक, कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र सह्याद्री, पोस्ट - तिवई हिल, तालुका खेड (राजगुरुनगर), जिल्हा - पुणे, पिन - ४१०५१३, महाराष्ट्र
दूरध्वनी : (०२१३५) २८८७७२, २८८३४८, २०३४७५ • ईमेल - kscskfi@gmail.com • वेबसाईट : http://www.kscskfi.com

## आनंद विहार, कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, बदलापूर

**संपर्कासाठी पत्ता** : आनंद-विहार, जे. कृष्णमूर्ती सेल्फ एज्युकेशन सोसायटी, जांभिळघर, राहाटोली गावाजवळ, बदलापूर (प.), ता. ठाणे,
पिनकोड- ४२१५०३, महाराष्ट्र, दूरध्वनी : ९४२०६०७४२८, (०२२) २५१५३०९४, २४२२३१९९ • ई मेल : zilog@vsnl.com

## विचाराने निसर्ग निर्माण केलेला नाही

आपण एकत्रपणे मनुष्य आणि निसर्ग यांच्या संबंधाविषयी बोलणार आहोत. म्हणजेच तुम्ही आणि पर्यावरण यांचे संबंध. पर्यावरण म्हणजे केवळ महानगरे, शहरे किंवा खेडेगाव जिथे कुठे तुम्ही रहात असाल तेवढेच नव्हे तर निसर्गामधील पर्यावरणसुद्धा पाहिले पाहिजे. जर तुमचे निसर्गाबरोबर संबंध नसतील तर माणसाबरोबरचे संबंध असणार नाहीत. निसर्ग म्हणजे गवताची कुरणे, वनराई, नद्या ही सगळी अद्‌भुत पृथ्वी, झाडे, पृथ्वीचे सौंदर्य – या सर्वांशी जर आपले संबंध नसतील, तर आपले एकमेकाबरोबर संबंध असणार नाहीत. कारण विचाराने निसर्ग निर्माण केलेला नाही. विचाराने वाघ किंवा रात्रीच्या चांदण्यामध्ये चमचमणारे पाणी निर्माण केलेले नाही. विचाराने निळ्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर बर्फाच्छादित विशाल डोंगरकडे निर्माण केलेले नाही. सूर्यास्त आणि एकाकी चंद्र – जेव्हा आकाशात दुसरा कुठचाही तारा नसतो – निर्माण केलेला नाही. तेव्हा विचाराने निसर्ग निर्माण केलेला नाही.

निसर्ग ही वास्तवता आहे. आपण माणसामध्ये जे नातेसंबंध निर्माण केलेले आहेत ते सुद्धा वास्तवच आहे, पण या वास्तवामध्ये संघर्ष, झगडे, प्रत्येकजण कोणीतरी बनण्याचा प्रयत्न करीत असतो. दोन्हीही ठिकाणी, भौतिक स्तरावर आणि आंतरिक आणि मी हा शब्द वापरतो की अध्यात्मिक सुद्धा–जेव्हा आपण कोणीतरी होण्याचा प्रयत्न करतो, कोणती तरी राजकीय किंवा धार्मिक प्रतिष्ठा मिळविण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा आपले दुसऱ्याशी नाते असत नाही, निसर्गाशी देखील नाही. तुमच्यापैकी बहुतेकजण गर्दी, आवाज, गलिच्छपणा असे पर्यावरण असलेल्या महानगरात राहता. बहुतेक करून तुम्ही निसर्गाच्या जवळ कधी आलेले नसता. पण तिथे हा अद्‌भुत समुद्र आहे आणि तुमचा त्याच्याशी काही संबंध नाही. तुम्ही त्याच्याकडे पाहता, कदाचित तुम्ही तेथे पोहतही असाल. परंतु समुद्राविषयीची भावना, त्याचे विराट सामर्थ्य आणि ऊर्जा, समुद्र किनाऱ्यावर आपटणाऱ्या लाटेचे सौंदर्य याच्याशी तुमचा संवाद नसतो. या सर्वाप्रति तुमची आंतरिक भावना नसते. समुद्राच्या या अद्‌भुत सौंदर्याचा आणि तुमचा संवाद नसतो. आणि जर तुमचा त्याच्याशी संबंध नसेल तर तुमचा दुसऱ्या माणसाबरोबर संबंध कसा असू शकेल? जर तुम्ही सागराचे दर्शन घेऊ शकला नाही, त्या पाण्याचे सौंदर्य, त्या लाटा, त्या भरतीच्या वेळी पुढे उसळणाऱ्या आणि मग मागेही सरणाऱ्या लाटांचे अगाध चैतन्य, तर तुमच्यामध्ये अवधान कसे येईल? किंवा माणसामधील नातेसंबंधामध्ये संवेदनशीलता कशी राहील? कृपया हे समजणे खूप महत्त्वाचे आहे. कारण जर आपल्याला सौंदर्याविषयी बोलायचे असेल तर ते केवळ भौतिक आकारामध्ये सामावलेले नसते. सौंदर्य हे मूलत: संवेदनशीलतेच्या गुणवत्तेवर अवलंबून असते. निसर्गाचे निरीक्षण करण्याच्या गुणवत्तेवर आधारित असते.

मुंबई, २४ जानेवारी १९८२

> प्रत्येक दिवसाच्या सौंदर्याला जागे रहा, प्रत्येक नवी पहाट ही एक चमत्कारच असतो. हे विश्व खरोखरच अद्‌भूत आहे आणि आज आपल्या निसर्गाशी असलेल्या संबंधांनी जे वळण घेतले आहे, आपल्या एकमेकातील नातेसंबंधांना आणि या पृथ्वीवरील सगळ्या सजीव प्राणीसृष्टीशी आपल्या असलेल्या संबंधांना जे स्वरुप आले आहे, त्यातून ते विश्व आपण नष्ट करीत आहोत.
>
> ओहाय, २२ मे १९८३

## ...तेव्हाच तुमचे विश्वाशी नाते जडेल

योगायोगाने तो काही दिवस तर घरांपासून दूर अशा उंच पर्वतावर एका लहानशा मोडकळीस आलेल्या घरात राहिला. तेथे खूप वृक्ष होते आणि वसंत असल्याने वातावरण सुगंधित होते. पर्वताचा एकांत आणि लाल मातीचे सौंदर्य तिथे होते. आकाशात झेपावणारी शिखरे बर्फाच्छादित होती आणि काही झाडांना बहर आला होता. या भव्य वैभवात तो एकटाच राहिला होता. जवळच जंगल होते व त्यात हरिण, क्वचित अस्वल आणि काळ्या तोंडाची आणि लांब लांब शेपूट असलेली मोठमोठी वानरे होती. सापही अर्थात होतेच. त्या गहन एकांतात तो विलक्षण पद्धतीने सर्वांशी संबंधित होता. तो कुणालाही दुखावू शकत नव्हता. फार काय रस्त्यावरच्या डेझी फुलाला देखील. त्या परस्परसंबंधात तुमच्यात आणि त्यांच्यात अवकाश अस्तित्वातच नव्हते. तसे मुद्दाम केले नव्हते, बौद्धिक वा भावनिक समजूतीमधून तसे घडत नव्हते; तर केवळ ते तसे होते .

विशेषत: वानराची टोळी संध्याकाळी खाली येई. त्यातील काही वानर जमिनीवर बसत, परंतु बरेचजण झाडांवर बसून शांतपणे निरीक्षण करीत. ते विलक्षण शांत असत. कधीमधी एखादा दुसरा नखांनी खाजवी. आम्ही एकमेकांकडे लक्षपूर्वक पाहत असू. ते आता दररोज संध्याकाळी येऊ लागले. खूप जवळ नाही वा झाडावर खूप उंचही नाही. आम्ही शांतपणे एकमेकांना जाणीत असू. आम्ही चांगले मित्र झालो होतो; परंतु आम्हाला एकमेकांच्या एकांतावर अतिक्रमण करायचे नव्हते. दुपारी जंगलात एकदा फिरत असताना तो अचानक एका मोकळ्या मैदानावर आला. अवतीभवतीच्या जागेमध्ये लहानमोठी धरून तीसच्यावर वानरे तेथे पूर्णपणे शांत व स्तब्ध बसली होती. त्यांना सहज स्पर्श करता आला असता. त्यांच्यात अजिबात भीती नव्हती. जमिनीवर बसून सूर्य डोंगरामागे जाईपर्यंत आम्ही एकमेकांना पाहत होतो.

तुमचा निसर्गाशी संपर्क सुटला की मानवतेशी तुमचा संपर्क सुटतो. जेव्हा तुमच्यात आणि निसर्गात परस्पर संबंध रहात नाही तेव्हा तुम्ही मारेकरी बनता. तुम्ही बालक सील, व्हेल, डॉल्फीन आणि माणसे यांची फ़ायद्यासाठी, मजेसाठी, खाण्यासाठी वा ज्ञानासाठी हत्या करता. मग निसर्ग तुम्हाला घाबरून जातो आणि आपले सौंदर्य आत ओढून घेतो. तुम्ही जंगलात लांब लांब फिरायला जाल; निसर्गरमणीय परिसरात राहायला जाल, परंतु तुम्ही मारेकरी असल्याने तुमची त्यांच्याशी मैत्री होत नाही. तुमचा कदाचित कुणाशीच संबंध नसतो. तुमच्या पत्नीशी वा पतीशीही नसतो. तुम्ही खूप कामात असता, काही कमावण्यात, काही गमावण्यात, तुमच्या खाजगी विचारात, तुमच्या सुखदु:खात. तुम्ही तुमच्या अंधाऱ्या एकांतात राहता आणि त्यातून सुटका म्हणजे आणखीन अंधारच. तुम्हाला फक्त तुमच्या लहानशा जीवनात तग धरून राहण्यातच रस असतो; मग त्यात निष्काळजीपणा, सहजसुख आणि हिंसा का असो. आणि तुमच्या बेजबाबदारपणामुळे हजारो भुकेने मरतात वा त्यांची हत्या केली जाते. तुम्ही खोट्या, भ्रष्टाचारी राजकारण्यांच्या, बुद्धिमंतांच्या वा तज्ज्ञांच्या हातात जगाची व्यवस्था सोपवता, तुमच्यातच सचोटी नसल्याने तुम्ही अनीतिमान, अप्रामाणिक आणि पूर्णपणे स्वार्थावर आधारलेल्या समाजाची निर्मिती करता. आणि मग ज्याला केवळ तुम्ही जबाबदार आहात अशा या परिस्थितीपासून समुद्रकिनारी वा जंगलात पळून जाता किंवा खेळ म्हणून बंदूक बाळगता.

हे सर्व तुम्ही जाणत असाल, परंतु ज्ञान तुमच्यात परिवर्तन निर्माण करू शकत नाही. जेव्हा तुम्हाला संपूर्णाची, एकत्वाची ही जाणीव होईल तेव्हाच तुमचे विश्वाशी नाते जडेल.

*कृष्णमूर्तींची रोजनिशी*

# जेव्हा तुम्ही निसर्गाला दुखवता तेव्हा स्वतःला दुखवत असता

खरं तर शिक्षण काय करीत आहे? ते मानवतेला, आपल्या मुलांना अधिक विचारी, अधिक सौम्य, उदार होण्यासाठी, परत पुरातन गोष्टींकडे, जगाच्या जुन्या विरूप अश्लाध्यपणाकडे न वळण्यासाठी मदत करणार का? शिक्षकाला जर खरच तळमळ असेल आणि ती असायलाच हवी – तर त्याने विद्यार्थ्याला त्याचे जगाशी असलेले संबंध पाहायला मदत केली पाहिजे. ते जग काल्पनिक किंवा स्वप्नरंजित भावविश्व नव्हे तर वास्तविक जग जिथे सर्व गोष्टी घडत असतात; आणि निसर्गाचे जग सुद्धा ज्यात वाळवंट, जंगल, सभोवताली असलेली थोडी फार झाडे यांच्याशी आणि प्राण्यांच्या जगाशी असलेले संबंध समजायला मदत करायला हवी. (सुदैवाने प्राणी राष्ट्रवादी नाहीत, ते फक्त जगण्यासाठी शिकार करतात.) जर शिक्षक व विद्यार्थी, निसर्गाशी, झाडांशी, समुद्राच्या लाटांशी संबंध हरवतील तर ते नक्कीच सर्व मानवतेशी संबंध हरवून बसतील.

निसर्ग म्हणजे काय? निसर्गाला वाचविण्यासाठी, प्राण्यांना, पक्ष्यांना, व्हेल- डॉल्फीनना वाचविण्यासाठी, प्रदुषित नद्या, तलाव, हिरवी कुरणे ह्यांना साफ स्वच्छ राखण्यासाठी अनेक प्रयत्न व चर्चा चालू आहेत. श्रद्धा किंवा धर्माप्रमाणे निसर्ग हा विचाराने घडवलेला नाही. निसर्ग हा वाघ आहे. त्या ऊर्जेसह, त्याच्या शक्तीच्या महान भावनेसह असलेला तो विलक्षण प्राणी. निसर्ग हा शेतातील एकुलते एक झाड आहे, तो कुरण आहे, तो उपवन आहे; फांदीच्या मागे लपलेली लाजरी खार निसर्ग आहे. निसर्ग म्हणजे मुंगी, मधमाशी आणि त्या धरतीवरील सर्व जिवंत गोष्टी. निसर्ग म्हणजे नदी, एक विशिष्ट नदी नव्हे, ती गंगा, थेम्स, मिसिसिपी असेल. ते सर्व बर्फाच्छादित पर्वत त्यांच्या निळ्याशार दऱ्यांसह म्हणजे निसर्ग आहे. ह्या सागरापर्यंत पोचणाऱ्या पर्वतरांगा निसर्ग आहे. ह्या सगळ्यासाठी भावना हव्यात. त्यांचा नाश करायचा नाही, आपल्या सुखासाठी त्यांना मारायचे नाही, अन्नासाठी प्राणी मारायचे नाहीत. आपण खातो त्या भाज्यांना आपण मारतो; परंतु आपल्याला कुठेतरी सीमा आखली पाहिजे. आपण भाजीपाला खाल्ला नाही तर कसे जगणार? म्हणून बुद्धी वापरून भेद जाणला पाहिजे.

निसर्ग आपल्या जीवनाचा भाग आहे. आपण बीजातून, पृथ्वीतून वाढलो आहोत आणि त्या सर्वांचे आपण भाग आहोत. आपण इतरांप्रमाणे प्राणी आहोत ही जाणीव फार जलद विसरतो आहोत. तुम्हाला झाडासाठी काही भावना आहेत का? त्याच्याकडे पहा, त्याचे सौंदर्य पहा, त्याचा ध्वनी ऐका. त्या छोट्याशा झाडासाठी, त्या लहान लहान जंगली झुडुपांसाठी, भींतीवर चढणाऱ्या वेलीसाठी, पानांवर पडणाऱ्या किरणांसाठी, विविध सावल्यांसाठी तुम्ही संवेदनशील असू शकता का? तुम्हाला त्या सर्वांचे अवधान असायला हवे आणि तुमच्या सभोवतालच्या निसर्गाशी अगदी जिवलग नाते असायला हवे. तुम्ही शहरात राहत असाल तरी इथे तिथे झाडे असतील. शेजारी बाग असेल, तिची निगा केली जात नसेल, जंगली झुडुपांनी भरलेली असेल. तरी त्यातील फुले पहा. आणि तुम्ही त्याचा भाग आहात, सर्व सजीव जगताचा भाग आहात ही जाणीव होऊ दे. तुम्ही निसर्गाला दुखवता तेव्हा स्वत:ला दुखावत असता.

मला माहित आहे हे सर्व काही या आधी बऱ्याच प्रकारे सांगितले गेले आहे. परंतु आपण पुरेसे लक्ष देत नाही असे दिसते; की आपण आपल्याच समस्यांच्या जाळ्यात, स्वत:च्या इच्छांमध्ये, स्वत:च्या सुखदु:खाच्या निकडीत अडकलोय म्हणून सभोवती पाहातच नाही, कधीही चंद्राकडे नजर फिरवत नाही? बघा त्याच्याकडे, तुमच्या डोळ्यांनी, कानांनी, वासाच्या संवेदनेने पहा. पहा ! जणू काही आयुष्यात पहिल्यांदाच पाहता असे पहा. हे जर तुम्हाला करता आले तर तुम्ही झाडे-झुडुपे, गवताची पात पहिल्यांदाच पाहात असता. मग तुमचे शिक्षक, आई, बाबा, भाऊ, बहीण ह्यांना पहिल्यांदा पाहू शकाल. त्याबद्दल एक विलक्षण भावना असेल, जशी एका नव्या ताज्या पहाटेची अद्‌भुतता, अनोखेपणा. जादू जी आधी कधीही नव्हती आणि पुन्हा कधीही नसेल.

खरंच निसर्गाशी सख्य साधा. शाब्दिक नव्हे, त्याच्या वर्णनात अडकणे नव्हे, तर त्याचा एक हिस्सा बना, अवधान राखा, तुम्ही त्या सगळ्याचे घटक आहात ही भावना जागवा. ह्या सगळ्याबद्दल प्रेम असायला, एखादे हरण, भींतीवरील पाल, जमिनीवर तुटून पडलेली फांदी ह्याबद्दलची कुतुहलाची भावना असायला सक्षम व्हा. सायंताऱ्याकडे, किंवा चंद्राकडे पहा, शब्दाशिवाय पहा, फक्त हा किती सुंदर आहे असे म्हणत त्याच्याकडे पाठ फिरवल्याशिवाय, दुसरीकडे लक्ष वेधल्याशिवाय पहा. तो एकटा तारा, ती नाजूक चंद्रकोर पहिल्यांदाच पाहिल्याप्रमाणे पहा. जर तुमच्यामध्ये व निसर्गामध्ये हे जिवलग नाते जुळले तर तुम्ही माणसांशी, शेजारी बसलेल्या विद्यार्थ्यांशी, शिक्षकांशी, तुमच्या आई-वडिलांशी जवळीक साधू शकाल. आपण परस्परसंबंधाची संपूर्ण भावना गमावली आहे, जिच्यात फक्त शाब्दिक प्रेम आणि कळकळ एवढेच नव्हे तर शब्दात व्यक्त न होणाऱ्या बंधुत्वाची भावनापण असते. ही ती भावना आहे की आपण सर्व एकत्र आहोत, आपण सर्व मानव आहोत, विभक्त नाहीत, मोडलेलो नाहीत, कुठल्या एका समाजाला, वंशाला किंवा आदर्शवादी कल्पनांना पकडून राहिलेलो नाही, परंतु आपण सर्व मनुष्यप्राणी आहोत आणि ह्या असाधारण सुंदर पृथ्वीचे रहिवासी आहोत.

तुम्ही सकाळी लवकर उठून कधी खिडकीबाहेर पाहिले आहे का किंवा बाहेर जाऊन झाडांकडे आणि खाली वाहाणाऱ्या झऱ्याकडे पाहिले आहे का ? त्याच्याबरोबर जगा, सर्व प्रकारचे आवाज ऐका, पानातून मंद वाहाणाऱ्या वाऱ्याची कुजबुज ऐका, पानावरचा प्रकाश पहा, टेकडीमागून वर येणारा सूर्य, कुरणावर पडणारा प्रकाश आणि ती कोरडी नदी किंवा टेकडीपलीकडे चरणाऱ्या मेंढ्या पहा. त्यांना मायेच्या, काळजीच्या व तुम्हाला कुणालाही दुखवायचे नाही आहे ह्या भावनेने पहा. जेव्हा निसर्गाशी तुमचे असे आपलेपणाचे नाते असते तेव्हा तुमचे दुसऱ्या व्यक्तीशी असलेले नाते सोपे, स्पष्ट व विनासंघर्ष असते.

*The Whole Movement of Life is Learning*, प्र. ५४

## ते जीवनाचे संपूर्ण ध्यान होते

समोरच्या वृक्षाच्या काळसर हिरव्या पानांमध्ये एक लाल फूल दिसत होते. व्हरांड्यातून तेवढे एकच फूल दिसते. दूरदूर टेकड्या पसरलेल्या आहेत. नदीप्रवाहामध्ये लाल रेती पसरली आहे. पलीकडे तो विशाल वटवृक्ष आणि अनेक चिंचेचे वृक्ष उभे आहेत. पण ते लाल फूलच काय ते दृष्टीत भरते. त्याच्या लाल रंगात अशी काही समृद्धी आहे ! त्याच्यात एवढा आनंदोल्हास दाटला आहे ! येथे दुसरा कुठला रंग उरतच नाही. ते निळ्याभोर आकाशाचे तुकडे, प्रकाशाने झळाळणारे ते मेघ, त्या जांभळट टेकड्या, भाताच्या शेतांचा तो लसलसता हिरवा रंग- हे सारे सारे रंग ओसरून जातात व त्या फुलाचा तो सुंदर तांबडा रंगच काय तो उरतो. त्या फुलाने, त्याच्या लाल रंगाने सारे आकाश व ते संपूर्ण खोरे भरून टाकले आहे. लवकरच ते कोमेजून जाईल व खाली गळून पडेल, नाहीसे होऊन

जाईल. त्या टेकड्या मात्र तेथे राहतील. बाकी आज ते लाल फूल अनंततेचे लाल फूल झाले होते. काळाच्या व विचाराच्या पार ते गेले होते. सारी प्रीती व सर्व आनंद त्याच्यात सामावला होता- तेथे कुठलेही कल्पनारंजन नव्हते. कसलीही भावविवशता नव्हती. ते फूल दुसऱ्या कशाचेही प्रतीक नव्हते. त्याला स्वत:चेच काय ते अस्तित्व होते. सायंकाळी ते कोमेजून जाणार होते, मृत्युमुखी पडणार होते. पण आता मात्र त्याच्यात संपूर्ण जीवन सामावले होते. तर्काच्या साह्याने सिद्ध केले जाणारे असे मात्र ते नव्हते. पण ते तर्कविसंगत असेही नव्हते. तो कल्पनारंजनाचा आभास मुळीच नव्हता. त्या टेकड्यांइतकेच ते वास्तव होते, आणि त्या एकमेकांना हाक देणाऱ्या आवाजांइतके देखील. ते जीवनाचे संपूर्ण ध्यान होते. जेव्हा वास्तवाचा प्रभाव ओसरतो, तेव्हाच आभास निर्माण होत असतो. प्रकाशाने झळाळणारा मेघ हे वास्तव आहे. पण त्याच्या अद्‌भुत सौंदर्याचा काहीही परिणाम संवेदनशून्य मनावर होत नाही. असे मन हे नाना प्रकारच्या प्रभावांमुळे, सवयींमुळे व सुरक्षिततेसाठी केल्या जाणाऱ्या अखंड पाठलागामुळे मंद व संवेदनशून्य बनत असते. आपल्या कीर्तीमध्ये, आपल्या विविधा नात्यांमध्ये किंवा आपल्या ज्ञानसंग्रहामध्ये सतत सुरक्षितता प्राप्त व्हावी यासाठी जे धडपडत राहतात, त्यांची संवेदनशीलता पूर्णपणे नष्ट होऊन जाते. आणि मग त्यांच्या ऱ्हासाला प्रारंभ होतो. ते लाल फूल, त्या टेकड्या, तो निळा अस्वस्थ सागर, तसेच ते अणुबॉम्ब- ही सर्व आपल्या जीवनाला दिली जाणारी आव्हाने असतात. त्यांना संपूर्णपणे प्रतिसाद देणे हे केवळ संवेदनशील मनालाच शक्य असते; आव्हानाला संपूर्णपणे उत्तर दिले गेले, म्हणजे संघर्षाची एकही खूण मागे उरत नाही. संघर्ष मागे उरला की उत्तर हे आंशिक स्वरूपाचेच होते हे ते स्पष्टपणे दर्शविते.

*कृष्णमूर्तींची दैनंदिनी,* २८ ऑक्टोबर १९६१

## तरी त्यांच्या चेहऱ्यावर हसू नांदत होते

आकाशात मेघ दाटले होते. टेकड्यांवर तर त्यांची गर्दी झाली होती. चारी दिशांना मेघांनी दाटी करून सोडली होती. आता पावसाची रिमझिम सुरू झाली होती. आकाशात एवढासाही निळा तुकडा आढळून येत नव्हता; त्या अंधारलेल्या वातावरणातच सूर्य मावळला. झाडे जणू दूरदूर अलिप्त असल्यासारखी भासत होती. त्या अंधारात चाललेल्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर तो पुरातन ताडवृक्ष ठळक उठून दिसत होता. वातावरणात जो थोडासा प्रकाश उरला होता, तो त्याने धरून ठेवला होता. नद्यांची पात्रे शांत होती. त्यांच्यातील लाल वाळू ओलसर दिसत होती, पण तेथे कोणतेही गाणे नव्हते, एकाही पक्ष्याचा आवाज कानी पडत नव्हता. ते सारे निस्तब्ध होऊन गेले होते. झाडांच्या दाट फांद्यांमध्ये त्यांनी रात्रीचा आश्रय घेतला होता. ईशान्येकडून वारा वाहू लागला होता. त्याच्याबरोबर अधिक काळेकाळे मेघ आले व पुन्हा पावसाची एक सर पडली. पण तिच्यात फारसा जोर नव्हता. जोराच्या सरी नंतरच बरसणार होत्या. - समोरचा खडबडीत लाल रस्ता निर्मनुष्य होता, रेताड होता आणि बाजूच्या गर्द टेकड्या त्याच्याकडे मोठ्या गर्वाने पहात होत्या. त्या रम्य रस्त्यावरून क्वचितच एखादी मोटार जाई. पण एका खेड्याकडून दुसऱ्याकडे जाणारे येणारे खेडूत आपल्या बैलगाड्यांमधून त्या रस्त्यावरून ये-जा करीत. ते सर्वजण अतिशय रोड असत. फाटकेमळके कपडे घातलेले असत आणि अस्वच्छही असत. त्यांची पोटे खपाटीला गेलेली असत. पण ते अतिशय काटक मात्र होते. आज शतकानुशतके ते अशाच परिस्थितीत राहत आले आहेत. कोणतेही शासन त्यांच्या या परिस्थितीमध्ये एकदम सुधारणा घडवून आणू शकत नव्हते. पण या खेडूतांच्या डोळ्यात थकवा भरला असला, तरी त्यांच्या चेहऱ्यावर हसू नांदत होते. पूर्ण दिवसाच्या श्रमानंतरही रात्री ते नाचू शकत, त्यांच्यात एक प्रकारचा अग्नी तेवत होता. परिस्थितीपुढे त्यांनी हार खाल्ली नव्हती. या भागात अनेक वर्षे पुरेसा पाऊस पडत नव्हता. पण हे वर्ष मात्र भाग्याचे ठरणार होते. यंदाच्या पावसामुळे त्यांना पुरेसे अन्न लाभणार होते व त्यांच्या गुरांना पुरेसा चारा मिळणार होता. आणि तो रस्ता पुढे जाऊन खोऱ्याच्या मुखाशी मोठ्या रस्त्याला मिळाला. त्या मोठ्या रस्त्यावर मोटरींची व बसेसची थोडीशी वाहतूक चालू होती. या मोठ्या रस्त्यावर बरीच दूर मोठी शहरे वसली होती आणि या बकाल शहरांमध्ये अनेक उद्योगधंदे चालू होते. श्रीमंतांची घरे व मंदिरे तेथे होती व मंद, निर्बुद्ध मने असलेली माणसेही तेथे वसत होती. पण या लहानशा उघड्या रस्त्यात मात्र एकांत नांदत होता. येथे अतिशय पुरातन असे डोंगर सारे काही अलिप्ततेने पाहत होते.

*कृष्णमूर्तींची दैनंदिनी,* २ नोव्हेंबर१९६१



प्रिय मित्रांनो,

या अंकाबरोबर 'अंतरलहरी' दोन वर्षे पूर्ण करत आहे. आणि म्हणून आम्हाला अंतरलहरीबद्दलची वाचकांची प्रतिक्रिया जाणून घेण्याची इच्छा आहे. तेव्हा सोबत दिलेला फॉर्म भरुन पाठवावा ही विनंती. प्रतिक्रिया ई-मेल वर अथवा पोष्टाने अंतरलहरीच्या पत्यावर पाठवावी.

तसेच अंतरलहरीसंबंधी कोणत्याही सूचना असल्यास मनमोकळेपणाने आम्हाला कळवाव्यात. त्याची योग्य ती दखल घेतली जाईल. अंतरलहरीमध्ये येत असलेल्या कृष्णमुर्तींच्या शिकवणुकीसंबंधी कोणतेही प्रश्न विचारायचे असतील तर त्याचेही स्वागत केले जाईल. त्या प्रश्नांची उत्तरे देण्याचा प्रयत्न केला जाईल.

वाचकांच्या सहकार्याबद्दल धन्यवाद,

संपादक

कृपया आपली प्रतिक्रिया येथे नोंदवा:

आपली संपर्क माहिती: (कृपया आपला पत्ता बदललेला असल्यास स्पष्टपणे त्याची नोंद करावी)

नाव:

पत्ता:

ई-मेल: दूरध्वनी:

☐ कृपया अंतरलहरीचा अंक यापुढेही विनामूल्य पाठवीत राहणे.

☐ यापुढे अंतरलहरीचा अंक पाठविण्याची तसदी घेऊ नये.

प्रतिक्रिया:



ज्ञानेंद्रियांना सुखकर अनुभव म्हणजे दुय्यम म्हणून डावलून अनुभवातीत अलौकिकतेला अग्रक्रम देणे, निसर्गातील कुरुपतेकडे मान फिरवून त्यातील सौंदर्याकडेच पाहणे-अशा कुठल्याही मनोभूमिकांचा कृष्णमूर्तींच्या विचारांमध्ये लवलेशही नाही. त्यांच्या निसर्गविषयक लिखाणातून त्यांची निरीक्षणामागची एकात्म दृष्टी जाणवते आणि ही दृष्टी त्यांच्या मानवाविषयीच्या लिखाणातही दिसून येते. त्यांनी निरीक्षण केले-ऑफिसातील कारकून, यशस्वी राजकारणी, उंच टाचांचे बूट घातलेली उच्चभ्रू महिला आणि तो वयस्कर माणूस -श्रध्दाळू, सहानुभूतीसाठी आणि आशिर्वादासाठी उत्सुक - यापैकी कोणालाही तुच्छ न लेखता, विश्वातल्या साऱ्या जीवसृष्टीसाठी त्यांना वाटणारा जो निरपेक्ष असा कळवळा ते प्रदर्शित करीत, त्याच निरपेक्ष कोवळीकीने त्यांनी या साऱ्यांचे निरीक्षण केले.

यापेक्षाही एका अधिक सखोल पातळीवर कृष्णमूर्तींनी तटस्थ वृत्तीने विचित्र वळणावाकणाच्या मानवी मनाचे निरीक्षण केले - संपूर्णपणे, सहजतेने, जणु काही तो 'पृथ्वीचाच एक हिस्सा' होता. त्यांच्या दृष्टीने माणसाच्या स्वत:शी, समाजाशी आणि निसर्गाशी असलेल्या संबंधात परिवर्तन घडून येऊ शकण्याच्या मुळाशी असे अविभक्त आकलन होते.

*- राधिका हर्झबर्गर*

जे.कृष्णमूर्ती यांची शिकवण सर्वांपर्यंत पोहोचविण्यासाठी 'कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया' ही संस्था कार्यरत आहे. फाउंडेशनने चेन्नई, ऋषी व्हॅली, बंगलोर, मुंबई, वाराणसी आणि सह्याद्री येथे अध्ययन केंद्रे, शाळा स्थापन केल्या आहेत. बऱ्याच ठिकाणी तेथील ग्रामीण समाजासाठी विकास केंद्रेही आहेत.

**कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडियाचे मुख्य कार्यालय:**
कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया,
वसंतविहार, १२४, ग्रीनवेज रोड, चेन्नई-६०० ०२८.
दूरध्वनी : (०४४) २४९३ ७८०३/७५९६,
ई-मेल : kfihq@md2.vsnl.net.in
वेबसाईट : www.kfionline.org

**कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडियाचे मुंबई केंद्र** हिम्मत निवास, मलबार हिल येथे असून येथे कृष्णमूर्तींची सर्व पुस्तके, डिव्हीडीज् उपलब्ध आहेत.

**संपर्क :-** कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया, बॉम्बे एक्झिक्युटिव्ह कमिटी, हिम्मत निवास, ३१, डोंगरसी मार्ग, मलबार हिल, मुंबई-४००००६. दूरध्वनी - २३६३३८५६
ई-मेल : kfimumbai@gmail.com

'अंतरलहरी' ही वृत्तपत्रिका दर चार महिन्यांनी प्रसिद्ध होणारी पत्रिका आहे. कृष्णजींच्या शिकवणीचा अभ्यास करू इच्छिणाऱ्या व्यक्तींसाठी कृष्णमूर्तींच्या साहित्याची मराठी भाषांतरे, त्यांच्या शिकवणीसंबंधी लेख, संस्थेच्या उपक्रमांची, अभ्यासकेंद्रांची तसेच पुस्तके वगैरेंची माहिती इ. ह्या पत्रिकेत प्रकाशित केली जाईल. आपल्याला ही पत्रिका घरपोच हवी असल्यास आमच्या मुंबई केंद्राच्या पत्त्यावर पत्र किंवा ई-मेल द्वारा कळवावे. कृपया आपले नाव, संपूर्ण पत्ता, दूरध्वनी आणि ई-मेल ही माहिती कळवावी.


**Statement about ownership and other particulars of Antarlahari Newsletter**
**FORM IV**

| | | |
|---|---|---|
| 1. Place of publication | : | Krishnamurti Foundation India, Bombay Executive Committee Himmat Niwas, 31,Dongersey Road, Malabar Hill, Mumbai – 400 006. |
| 2. Periodicity of publication | : | Once in four months, (Januuary, May, September) |
| 3. Printer's Name | : | Anand Limaye |
| Whether citizen of India | : | Yes |
| Address | : | India Printing Works, 42, G.D.Ambekar Marg, Wadala, Mumbai – 400031. |
| 4. Publisher's Name | : | P. V. Dabholkar |
| Whether citizen of India | : | Yes |
| Address | : | Krishnamurti Foundation India, Bombay Executive Committee Himmat Niwas, 31,Dongersey Road, Malabar Hill, Mumbai – 400 006. |
| 5. Editor's Name | : | Vasanti Padte |
| Address | : | Krishnamurti Foundation India, Bombay Executive Committee Himmat Niwas, 31,Dongersey Road, Malabar Hill, Mumbai – 400 006. |
| 6. Name and address of Individuals who own the newspaper and partners or shareholders holding more than one percent of the total capital | : | Krishnamurti Foundation India, Bombay Executive Committee Himmat Niwas, 31, Dongersey Road, Malabar Hill, Mumbai – 400 006. |

I, P. V. Dabholkar, hereby declare that the particulars given are true to the best of my knowledge and belief

Sd
( P.V. Dabholkar)


**कृष्णमूर्तींविषयीच्या काही वेबसाईटस् :**

www.jkrishnamurti.org
www.kfionline.org
www.kfa.org
www.kfoundation.org
www.kinfonet.org


*Published in January, May, September*

Periodical

*Registered with The Registrar of Newspapers for India under No. MAHMAR/2008/25259*



*If undelivered please return to :*
**Krishnamurti Foundation India**
Bombay Executive Committee, Himmat Niwas, 31, Dongersey Road,
Malabar Hill, Mumbai - 400 006.
Tel.: (022) 2363 3856 Email : kfimumbai@gmail.com
Websites : www.kfionline.org, www.jkrishnamurti.org



*Published by P.V. Dabholkar on behalf of Krishnamurti Foundation India, Bombay Executive Committee, Himmat Niwas, 31, Dongersey Road, Malabar Hill, Mumbai-400 006.*
*Printed by S.V. Limaye at India Printing Works, 42, G.D. Ambekar Marg, Wadala, Mumbai - 400 031. E-mail : ipw@vsnl.net ● Editor : Vasanti Padte*
*Designed by Eurythmic Designs, Rite-Print-Pak, Mumbai- 400 013. E-mail : info@Eurythmicdesigns.com*